# <u>कांताबाईची भाषा, 'ती' मुलं अन् समान शाळा</u>

- **किशोर दरक**

(**Note:** The advertisement discussed in this article is attached on page 4).

**घटना एक**: २००९च्या मध्याला दिल्लीजवळच्या नॉईडा इथल्या 'जेनेसिस ग्लोबल स्कूल' या शाळेनं एक जाहिरात दिली होती. टिपिकल हिंदी सिनेमात दाखवतात तशी कानडी/मराठी वाटणारी एक कामवाली बाई फरशी पुसतीय अन् एक उच्चमध्यमवर्गीय गोरी, गुबगुबीत मुलगी एका हातात झाडू अन् दुसऱ्या हातात चेंडू घेऊन बाईसोबत खेळतीय. जाहिरातीनं प्रश्न विचारला होता-"कांताबाई तुमच्या मुलीची गुरू बनतीय का?" पालक दिवसभर बाहेर असताना ८ ते २ किंवा ७ ते १२ वगैरे वेळांच्या शाळांमधली मुलं नोकरांच्या सहवासात राहतात, यातला 'धोका' टळावा म्हणून मुलांना 'जेनेसिस' या दिवसभर चालणाऱ्या शाळेचा पर्याय देण्यात आला होता. २३ एकरांचा सेंट्रली ए.सी. कॅम्पस असणाऱ्या शाळेच्या या जाहिरातीनं श्रीमंत पालकांना आणखीन एक इशारा दिला होता – "तुमची मुलगी कामवालीची भाषा शिकत असताना इतरांची मुलं मात्र एखादी परकीय भाषा शिकतायत."

**घटना दोन**: 'शिक्षणाचा मुलभूत अधिकार कायदा' संसदेनं २००९च्या ऑगस्ट महिन्यात मंजूर केला. १एप्रिल २०१० पासून लागू होणाऱ्या या कायद्यातल्या तरतूदींनुसार सर्व खाजगी शाळांनी (म्हणजे अनुदानित, विनाअनुदानित, कोणत्याही माध्यमाच्या) त्यांच्या पहिलीच्या प्रवेशक्षमतेच्या २५% जागा त्या परिसरातल्या सामाजिक, आर्थिक मागास वर्गातल्या मुलांसाठी मोफत उपलब्ध करून द्यायच्या होत्या. पहिलीत आलेली ही मुलं आठवीपर्यंत त्या शाळांमध्ये राहणं अपेक्षित होतं.

**घटना तीन**: बंगळूरूच्या कोरामंगलम् भागातल्या 'बेथनी हायस्कूल' या श्रीमंतांच्या शाळेनं जुलै २०१० मध्ये पालकांना एक पत्र दिलं. 'शिक्षणाचा मुलभूत आधिकार' कायद्यापासून पालकांना सावध करणाऱ्या या पत्रात म्हटलंय - "एकदा का हा कायदा लागू झाला की 'ती' मुलं शाळेत येतील. तुमच्या मुलांना मारहाण झाली, मुलींसोबत गैरवर्तन झालं किंवा शाळेत धुम्रपानासारख्या गोष्टी घडल्या तरी आम्ही काहीही करू शकणार नाही..... या कायद्यानुसार बेशिस्त मुलांना शिक्षा देता येणार नाही." आपली मुलं भविष्यात कुणासोबत शिकणारायत याची माहिती पालकांना मिळणं गरजेचं आहे, अशा शब्दात शाळेनं आपल्या पत्राचं समर्थन केलं होतं.

गेल्या दोन वर्षांमधल्या या तीन घटनांनी देशातल्या शिक्षणव्यवस्थेतली उतरंड पुन्हा एकदा अधोरेखित केलीय. 'खिशात जेवढा पैसा तेवढी तुम्हाला मिळणाऱ्या वस्तूची गुणवत्ता' या 'मार्केट' आधारित सिद्धांताला बळ देणारा कायदा आपल्या 'कल्याणकारी' राज्यानंच केलाय. श्रीमंतांच्या शाळा तशाच ठेवून त्यांच्या क्षमतेच्या २५% जागा गरीबांसाठी राखीव करणारा कायदा म्हणजे 'देशातली क्रांती' असल्याची निर्लज्ज घोषणा मानव

संसाधन विकास मंत्र्यांनी केली होती. देशातल्या सर्व खाजगी शाळांची एकूण प्रवेशक्षमता चार कोटींच्या घरात आहे. या सर्व शाळांनी अगदी प्रामाणिकपणे गरीब मुलांना प्रवेश दिला तरी जास्तीत जास्त एक कोटी मुलांना अशा श्रीमंत शाळांमध्ये प्रवेश मिळू शकेल. ६ ते १४ वयोगटातल्या उरलेल्या जवळपास १५ कोटी मुलांच्या शिक्षणाचं काय? त्यांना सरकारी शाळांमध्ये शिक्षण देणं हे आता सरकारसाठी बंधनकारक आहे. प्रश्न आहे तो तिथं असणाऱ्या सोयी-सुविधांचा. खाजगी, अतिश्रीमंत, अतिमहाग शाळा ए.सी. स्पोर्टस् कॉम्प्लेक्स सारख्या ज्या सुविधा पुरवितात त्या अवाजवी अन् अनेकदा शैक्षणिक दृष्ट्या चुकीच्या असतात. पण पिण्याचं निर्धोक पाणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र संडास-मुताऱ्या, प्रत्येक वर्गासाठी एक स्वतंत्र शिक्षक अन् एक स्वतंत्र खोली अशा किमान सुविधादेखील अनेक सरकारी शाळांमध्ये तसंच ग्रामीण, दुर्गम भागातल्या खाजगी शाळांमध्ये आजदेखील नाहीयत. चकचकाट म्हणजे गुणवत्ता असं इथं अजिबात सुचवायचं नाहीय. पण शिक्षणातल्या किमान गुणवत्तेसाठी देखील काही किमान सुविधांची गरज असते अन् त्यांच्या अभावानंच गरीबासाठीच्या सरकारी शाळा 'गरीब' शाळा ठरतात.

१९६०च्या दशकापासून मध्यमवर्गानं पाठ फिरवल्यामुळं सरकारी शाळांमधल्या सुविधांबद्दल चर्चा होणं हळूहळू बंद झालं. खाजगी अन् त्यातही इंग्रजी माध्यमाचं शिक्षण ही यशाची गुरूकिल्ली बनली. १९९१नंतरच्या जागतिकीकरणोत्तर जगात 'माझ्या मुलांना उत्तमोत्तम सुविधा मिळाव्यात' या इच्छेबरोबरच 'त्यांच्या' मुलांना त्या सुविधा मिळू नयेत ही इच्छा नवश्रीमंत वर्गात मूळ धरू लागली. १९६४-६६च्या कोठारी आयोगानं मांडलेली 'समान शाळां'ची कल्पना प्रत्यक्षात उतरवणं अशक्य बनत गेलं. समान शाळेच्या संकल्पनेनुसार देशातल्या सर्व जात-वर्गीय मुलांना त्यांच्या परिसरात एक शाळा (शेजार शाळा) मिळणं अपेक्षित होतं. यामुळं देशातल्या सर्व मुलांना समन्यायी गुणवत्तेचं शिक्षण मिळेल, घटनेनं सांगितलेलं संधीच्या समानतेचं तत्व प्रत्यक्षात उतरेल अन् सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे देशातल्या बहुविधतेबद्दल, विविधतेबद्दल सर्व मुलांच्या मनात आदर निर्माण होऊन लोकशाही सुदृढ होईल, अशी कोठारी आयोगाची धारणा होती. संसदेनं मान्य केलेल्या या शिफारशींची अंमलबजावणी न होण्यामागं निव्वळ राजकीय इच्छाशक्तीचा अभाव नसून कांताबाईच्या भाषेला धोकादायक मानणारी, तीव्र घृणेची मानसिकता देखील आहे.

शाळांमधलं शिक्षण म्हणजे विस्तृत अर्थानं भाषाशिक्षणच असतं. शाळांमधून लिहीण्या-वाचण्या-बोलण्याची प्रमाणभाषा तर शिकवली जातेच, पण त्याचबरोबर खाण्या-पिण्या-कपड्यांच्या विशिष्ट सवयींची, विशिष्ट प्रकारच्या मूल्यव्यवस्थेला विनातक्रार स्विकारण्याची, समाजात चालू असलेल्या व्यवस्थेला सर्वांसाठी कल्याणकारी मानण्याची, आज्ञाधारकपणाला नेहमी सद्गुण मानण्याची, प्रश्न विचारण्याला जवळ-जवळ गुन्हा मानण्याची, समाजातल्या शोषक उतरंडींकडं दुर्लक्ष करण्याची, स्वत:चं कल्याण हे अंतिम ध्येय मानण्याची अन् त्यासाठी दुसऱ्याला मागं लोटायला तयार होण्याची भाषा – म्हणजे विशिष्ट प्रकारचं सामाजिकीकरण शाळांमधून

शिकवलं जातं. शोषणाधारित समाजात यथास्थितीवादाला (status quo) समाजाचं ध्येय बनवण्याचं काम शाळांमधल्या सामाजिकीकरणाच्या या प्रक्रियेत घडतं. या स्थितीवादाचा फायदा घेणाऱ्या वर्गांची मुलं आज 'जेनेसिस' किंवा 'बेथनी' सारख्या शाळेत जातायत अन् म्हणून या शाळा आपल्या 'ग्राहकां'ना 'त्या' मुलांपासून किंवा 'कांताबाई'च्या नेतृत्वापासून सावध करतायत.

कांताबाईची भाषा प्रमाणभाषा नाही, ग्रामीण किंवा गावराण वळणाची आहे म्हणून या भाषेला विरोध आहेच. पण त्याहून जास्त गंभीर मुद्दा या विरोधात आहे. कांताबाईच्या भाषेत उच्चभ्रू, अभिजन वर्गांच्या स्थितीवादी सामाजिकीकरणाला प्रश्न विचारण्याची, नाकारण्याची अन् उलथून लावण्याची ताकद आहे. म्हणून कांताबाईला तुमच्या मुलीची/मुलाची 'गुरू' बनू देऊ नका असं ती जाहिरात म्हणतीय. दुसऱ्या बाजूला 'बेथनी स्कूल'ला 'त्या' मुलांची भिती वाटतीय. यामध्ये 'त्यांची' मुलं दुर्गुणी असतात ही वृत्ती तर उघडपणे दिसती आहेच पण 'त्या' मुलांना नाकारण्याचं कारण या वृत्तीच्या पलिकडं जाणारं आहे. 'ती' मुलं 'आमच्या' मुलांसोबत शिकली तर आमच्या मुलांना देशातल्या बहुसंख्यांच्या वास्तवाचं भान येण्याची शक्यता आहे. असं घडलं तर आमच्या निरागस मुलांचं निगरगट्ट, स्वकेंद्री प्रौढात रूपांतर करणं अवघड होणार आहे.

पण.... घरमालकाची मुलगी आपल्यासोबत खेळत असताना आपली मुलं मात्र दुसऱ्या कुणासाठी तरी राबतायत, श्रीमंतांच्या शाळा आपल्या मुलांविरूद्ध विखारी अन् किळसवाणा प्रचार करतायत हे कांताबाईंच्या लक्षात येणं अटळ आहे.... जेव्हा ही गोष्ट त्यांच्या लक्षात येईल तेव्हा अशा जाहिराती, अशा शाळा अन् अशा उच्चभ्रू कोडगेपणाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल.... माध्यमक्रांतीच्या शिखरावर असलेल्या जगात ट्यूनेशियातला वणवा इजिप्तपर्यंतच पसरेल असं मानण्याचं काहीच कारण नाही.

---

**किशोर दरक**
८ शिवम्, घारपुरे कॉलनी,
११६०-६१/६ शिवाजीनगर,
हर्डीकर हॉस्पिटलजवळ,
पुणे ४११००५ (महाराष्ट्र, भारत)
संपर्क : ९४२३५८६३५१
ईमेल : kishore_darak@yahoo.com

===


GENESIS GLOBAL SCHOOL
ASPIRE TO INSPIRE
IS KANTABAI BECOMING YOUR CHILD'S GURU?
When your child is wasting her after-school hours at home, someone else's child is mastering her dribbling in our basketball court. While your child is learning your maid's language, someone else's child is learning a foreign language. When your child is stuck in 40 mins of traffic for a 1-hour dance class, someone else's child has completed two 45 min sessions of golf and swimming, in our extended day school. When your child gets home and starts with the homework, our students are already done for the day... because at Genesis Global School every child gets the time and the space to excel!
Campus | Regular Hostel (Class 1 onwards) | 5 Day Hostel (weekends with parents) | Extended Day School up to 6 pm | Electronic Surveillance Security | Environment Friendly Green Campus: Solar Heating • Rain Water Harvesting • Waste Management • Ozonized Air to Improve Air Quality • Effluent Treatment of Waste Water | Unmatched Sports Facilities: Olympic Size & Toddler Pool • 10,224 sq. mtr. of Air Conditioned Sports Hall • 2 Tennis Courts • 3 Badminton Courts • 2 Squash Courts • 400 mtr. Athletic Track • Martial Arts • Golf • Horse Riding | Connectivity via 6 Lane Expressway
Admission OPEN
In collaboration with • Clifton College, U.K. • L'Ermitage-International School of France
Pre-nursery to Class 10+2 • Admissions Open for Classes Pre-nursery to Class VII
GENESIS GLOBAL SCHOOL, A-12, Sector-132, Expressway, Noida-201301, Delhi NCR, India.
Visit us at: www.genesisglobalschool.com • E-mail: principal@genesisglobalschool.com